# मॅनइटिंग लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग

**जिम कॉर्बेट**

अनुवाद

**विश्वास भावे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

The Man-eating leopard of Rudraprayag : Jim Corbett
Marathi translation by Vishwas Bhave
First published in Marathi by Riya Publications in arrangement with Oxford University Press India, New Delhi
© Oxford University Press, 1947.

**मॅनइटिंग लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग :** जिम कॉर्बेट

अनुवाद : विश्वास भावे

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
विश्वास भावे
बी/३३, डोंबिवली नागरिक
सो. फुले रोड, डोंबिवली(प.) ४२१२०२
मो.नं. : ९८२०४२४८६७ ईमेल: vshwas.bhave@gmail.com

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे


**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २००/-





झाडांवर मनापासून प्रेम करणाऱ्या,
स्वत:चं ज्ञानभांडार मुक्तहस्ताने वाटणाऱ्या
आमच्या सर्वांच्या आवडत्या,
शिंपी मॅडम...
डॉ. श्रद्धा शिंपी यांच्या स्मृतीस...



# मनोगत

या पुस्तकातील गोष्ट १९२५-२६ सालची आहे. आजचा जो उत्तराखंड आहे त्याचा पश्चिम भाग म्हणजे गढवाल व पूर्व भाग म्हणजे कुमाऊँ. देहराडून, हरिद्वार, ऋषिकेश, उत्तर काशी व चारधाम हे गढवालमध्ये येतात तर नैनिताल, अल्मोडा, पिंडारी, रानीखेत हे सर्व कुमाऊँमध्ये येतं. पहाडी इलाखा, घनदाट जंगलं यामुळे तिथे सर्व प्रकारचं वन्य जीवन होतं, साहजिकच तिथे माणूस आणि जनावरं एकमेकांशी जुळवून घेऊन राहत होती. त्यांनी कधी कधी लोकांची गुरं, बकऱ्या उचलणं म्हणजे लोकजीवनाचा एक स्वाभाविक भाग धरून चालत; पण १९०७ ला चंपावतच्या वाघिणीपासून नरभक्षक वाघ किंवा बिबळ्या या प्रकाराची ओळख झाली.

१९१८ च्या एन्फ्लुएन्झाच्या साथीनंतर अचानक या पुस्तकातल्या नरभक्षक बिबळ्याचा उदय झाला आणि त्याने ८ वर्षांत एकूण १२५ माणसांचा बळी घेतला. हा रुद्रप्रयागचा बिबळ्या सर्वात जास्त प्रसिद्धीच्या झोतात आला तो बद्रीनाथ, केदारनाथला जाणाऱ्या यात्रेकरूंमुळे. १९०७ ते १९१० या काळात जिम कॉर्बेटने चंपावत, मुक्तेश्वर या नरभक्षक वाघांची तर पानारच्या बिबळ्याची शिकार केली होती; त्यामुळे साहजिकच रुद्रप्रयाग भागात धुमाकूळ घालणाऱ्या या पुस्तकाच्या नायकाचा (की खलनायकाचा?) बंदोबस्त करण्याचं आमंत्रण त्याला मिळालं.

पण जिम कॉर्बेट हा काही फक्त शिकारी नव्हता. त्याच्या सर्व पुस्तकांत आपल्याला आढळून येईल की तो आला, त्यानं पाह्यलं, नेम धरला आणि त्याला मारलं या प्रकारचा दृष्टिकोन दिसत नाही... एखादं जनावर नरभक्षक का बनतं, त्याच्या सवयी, खाद्य या सर्व गोष्टींबद्दल तो अतिशय सहानुभूतीने लिहितो.

या पुस्तकात तो आपल्याला संपूर्ण गढवाल फिरवून आणतो. पहाडी माणसाची ओळख करून देतो; ही शिकारकथा न वाटता एक परिपूर्ण कादंबरी

वाटावी इतकं हे लिखाण सुंदर आहे. त्या बिबळ्याला मारण्याचे सततचे प्रयत्न लिहिताना कुठेही कंटाळवाणे वाटू नये याची कॉर्बेटला जाण आहे, त्यामुळे त्याने यात्रामार्ग, रानडुकराचा पाठलाग, फिशिंग इंटरल्युड, अशी थोडीशी विरंगुळा देणारी प्रकरणं पेरली आहेत. त्याचबरोबरच गढवाली लोकांच्या अतिमानवी शक्तींबद्दलच्या श्रद्धा, साधेपणा, त्यांची संस्कृती, याबद्दलच्या लिखाणामुळे एक क्षणसुद्धा तोचतो पणा येत नाही. सर्वात महत्त्वाचं म्हणजे इतर जनावरांचे कॉल्स, ठसे यावरून माग काढणे, फक्त जंगलखुणांवरून घडलेल्या घटनांची मांडणी करणे, यामधील त्याची हातोटी आपल्याला अवाक् करते आणि जंगलांबद्दलची आपली दृष्टी बदलून जाते.

या पुस्तकातल्या सर्व घटना बद्रीनाथ-केदारनाथ यात्रामार्गावर आणि आसपासच्या दुर्गम डोंगराळ इलाख्यात घडल्या आहेत. देशभरातले ६०,००० यात्रेकरू या मार्गावरून त्या काळात पायी जात आणि त्यातले बरेच यात्रेकरू या बिबळ्याचे बळी ठरल्यामुळे गढवालला सतत ८ वर्षे कर्फ्यूखाली ठेवणाऱ्या या नरभक्षक बिबळ्याला जगभरच्या सर्व वृत्तपत्रांतून प्रसिद्धी मिळाली. त्याला मारण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले गेले.

या सर्व प्रक्रियेमध्ये गढवालचा डेप्युटी कमिशनर विल्यम इबॉटसन या माणसाचीही ओळख आपल्याला होते. हा इबॉटसन कॉर्बेटचा परममित्र बनला आणि त्यापुढेही कित्येक मोहिमांमध्ये त्याचा साथीदार राहिला. 'मॅन ईटर्स ऑफ कुमाऊँ' मध्ये तो तुम्हाला कित्येक वेळेला भेटेल.

गढवालचा हा भाग अत्यंत रौद्र, पहाडी होता, ज्या काळात त्या रस्त्यांवरून या भागात कोणतीही वाहने जात नसत, त्या काळात, जवळजवळ ५०० चौ. मैल एवढ्या प्रदेशात जिम कॉर्बेट आणि इबॉटसन सतत चार महिने फक्त रात्रीचा वावर असलेल्या या नरभक्षकाच्या मागावर होते. कित्येक वेळेला स्वत:चाच बळी जाण्याची वेळही त्यांच्यावर आली... आणि कल्पना करा... कॉर्बेट त्यावेळी ५२ वर्षांचा होता.


एक गोष्ट मुद्दाम सांगावीशी वाटते; या पुस्तकातील रेखाचित्रे रेमंड शेपर्ड या जगप्रसिद्ध चित्रकाराची आहेत. मूळ इंग्लिश पुस्तकात ती आहेत; पण नंतर निघालेल्या ओम्निबस पुस्तकात मात्र ती नाहीत आणि यापुढे तर ही अप्रतिम रेखाचित्रं कोणालाही पाहायला मिळतील अशी शक्यता नाही.

कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रण, ज्ञान या सर्वच गोष्टींनी परिपूर्ण हे पुस्तक मराठीत यावं अशी इच्छा होती !

चला तर... गढवालमधल्या बद्रीनाथ-केदारनाथ यात्रामार्गावरच्या या अत्यंत निसर्गरम्य पण रौद्र अशा पहाडी भागात...जिथे ही अतिशय थरारक शिकारकथा घडली होती.

**– विश्वास भावे**

✦✦✦



# *अनुक्रमणिका*


१. यात्रामार्ग ........................................................ ११

२. नरभक्षक ........................................................ १५

३. दहशत........................................................ १९

४. आगमन ........................................................ ३३

५. शोधमोहिमेची सुरुवात........................................ ३६

६. पहिला बळी.................................................... ४०

७. ठावठिकाणा शोधताना........................................ ४३

८. दुसरा बळी.................................................... ४६

९. तयारी........................................................ ५३

१०. कफनीवाल्याची किमया...................................... ५८

११. थोडक्यात बचावलो.......................................... ६१

१२. जिन ट्रॅप........................................................ ६३

१३. शिकाऱ्यांच्या शिकारीवर...................................... ७०

१४. माघार........................................................ ७८

१५. थोडंसं फिशिंग................................................ ८४

१६. एका बोकडाचा बळी........................................ ९३

१७. सायनाईड पॉयझनिंग........................................ ९७

१८. टच ॲण्ड गो................................................ १०४

१९. सावधगिरीचा धडा !........................................ ११५

२०. रानडुकराचा पाठलाग........................................ ११९

२१. पाईनच्या वृक्षावरची रात्र.................................... १२४

२२. ती भयाण रात्र................................................ १३५

२३. दोन बिबळ्यांचं युद्ध........................................ १४१

२४. अंधारातला नेम.............................................. १५२

२५. भरतवाक्य.................................................... १६७


✦✦✦